प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# ‘पुस्तक वाचन म्हणजे कस्तुरी मृग’

**● प्रा. डॉ. सुर्वे : ‘के. के. वाघ’मध्ये ‘वाचन संकल्प : महाराष्ट्राचा’ उपक्रम**

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

वाचनासाठी आज भरपूर माध्यमे उपलब्ध आहेत तरीदेखील पुस्तकांच्या वाचनातून एक वेगळेच समाधान मिळते. पुस्तकांचे वाचन म्हणजे कस्तुरी मृग होय, असे प्रतिपादन प्रा. डॉ. विद्या सुर्वे यांनी केले.

‘वाचन संकल्प : महाराष्ट्राचा’ या शासन उपक्रमांतर्गत के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेत कविवर्य कुसुमाग्रज मध्यवर्ती ग्रंथालयाच्या वतीने मराठी भाषेतील पुस्तकांचे प्रदर्शन व व्याख्यान झाले. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर, अधिष्ठाता तथा ग्रंथालय समन्वयक प्रा. डॉ. एस. वाय. कुटे व एम. पी. नंदन उपस्थित होते. प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी स्वागत केले.



**नाशिक : ‘वाचन संकल्प : महाराष्ट्राचा’ उपक्रमांतर्गत पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्रा. डॉ. विद्या सुर्वे. समवेत मान्यवर.**

प्रा. डॉ. सुर्वे म्हणाल्या, मराठी भाषेला इतिहास लाभला आहे. घरोघरी मराठी भाषा बोलली जात असल्याने या भाषेवर संकट निर्माण होण्याचा विषयच येत नाही. त्यातच नुकतेच सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याने आपली भाषा आता नवी उंची गाठणार असल्याचेही सुर्वे यांनी यावेळी सांगितले. उपस्थित मान्यवरांनीदेखील पुस्तक वाचनाचे फायदे याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. प्रा. डॉ. एस. वाय. कुटे यांनी प्रास्ताविक केले. एम. पी. नंदन यांनी आभार मानले.

Nashik Edition
Jan 12, 2025 Page No. 06
Powered by: erelego.com